# मुंबई विद्यापीठ

e-mail : prelection@election.mu.ac.in
Tel. No. : (022)-22708795
(022)-22696147

अत्यंत तातडीचे/हस्ते बटवडा
क्र. नि.वि./आयसीडी/२०१८-१९/१५०
९ ऑगस्ट, २०१८

प्रा. जगदिश राणे,
कला आणि वाणिज्य महाविद्यालय,
फोंडाघाट, विद्यानगर,
ता. कणकवली
जि. सिंधुदुर्ग – ४१६ ६०१.

डॉ. मधु गंगाराम नाग,
कोकण एज्युकेशन सोसायटी [illegible]
शास्त्री कला, वाणिज्य आणि विज्ञान
महाविद्यालय,
पेझारी,
पो. पोयनाड, ता. अलिबाग,
जि. रायगड– ४०२ १०८.

डॉ. गोकुळ शिखरे,
गोदावरी शामराव परुळेकर कला, वाणिज्य आणि
विज्ञान महाविद्यालय,
तलासरी,
जि. पालघर – ४०१ ६०६.

विषय : अभ्यासमंडळावरील नामनिर्देशनाबाबत.

महोदय,

आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ४०(२)(ख)(b)(iii) अन्वये मा. कुलगुरूंनी अधिष्ठात्यांशी विचार विनिमय करून, मराठी **(Marathi)** अभ्यासमंडळावर आपले सदस्य म्हणून नामनिर्देशन केले आहे. सदर अभ्यासमंडळावर झालेल्या नामनिर्देशनाबद्दल, मी विद्यापीठ प्रशासनातर्फे, आपले हार्दिक अभिनंदन करीत आहे.

आपले नामनिर्देशन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ४०(२)(ख)(b)(iii) व अधिसूचना क्रमांक एमयुएस–२०१६ (३४०/१६) वि.शि–३, दिनांक २८ एप्रिल, २०१७ अन्वये निश्चित केलेल्या पात्रतेच्या अधिन राहून असेल. (प्रत संलग्न). यासाठी आपला स्वपरिचय (CV) त्वरीत निवडणूक विभागाकडे पाठवावा.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ६२ नुसार मराठी **(Marathi)** अभ्यासमंडळाचा कालावधी १ सप्टेंबर, २०१७ ते ३१ ऑगस्ट, २०२२ पर्यंत असेल. परंतु अभ्यासमंडळावरील आपल्या सदस्यत्वाची मुदत तात्काळ प्रभावाने सुरू होऊन दिनांक ३१ ऑगस्ट, २०२२ पर्यंत कलम ६३,६४ आणि ६८ मधील तरतुदींच्या अधिन राहून असेल.

सदर अभ्यासमंडळ हे महत्वाचे प्राधिकरण असल्याने, त्यात आपल्या सक्रीय सहभागाची, सहकार्याची आणि मार्गदर्शनाची अपेक्षा व्यक्त करतो.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ४० आणि ४१ नुसार अभ्यासमंडळाची रचना व कार्यसंबंधीची माहिती तसेच कलम ६२, ६३, ६४ आणि ६८ या छायांकित प्रती सोबत जोडत आहोत.

कृपया हे पत्र मिळाल्याची पोच द्यावी.

आपले स्नेहांकित,

(डॉ. [illegible])
उपकुलसचिव (प्र)

2021/8/7 09:56

PC_C/desktop/bos/ bos elected letter

# मुंबई विद्यापीठ

अत्यंत तातडिचे/हस्ते बटवडा
निवडणूक विभाग
क्र. नि.वि./आयसीडी/अभ्यासमंडळ/७४८
१५ फेब्रुवारी, २०१८

प्रति,

१. डॉ. बालाजी अण्णासाहेब सुरवसे
मु.पो. फोंडाघाट,
तालुका - कणकवली,
जिल्हा - सिंधुदुर्ग.

२. डॉ. सुरेश सिताराम नळे
श्री विठ्ठल समर्थ नगर,
भरणेनाका, ता. — खेड,
जिल्हा — रत्नागिरी
पीन कोड — ४१५ ७०९.

३. डॉ. वैदेही श्रीराम दप्तरदार
३०४, विसारिया टॉवर, गोखले रोड,
नौपाडा,
ठाणे - ४०० ६०२.

महोदय/महोदया,

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ४०(२)(ग)(c) मधील तरतूदीनुसार महाविद्यालयीन विभागप्रमुखांच्या तीन जागांसाठी झालेल्या निवडणूकीचा निकाल शुक्रवार, दिनांक ९ फेब्रुवारी, २०१८ रोजी जाहिर करण्यात आला.

मला कळविण्यास अत्यंत आनंद होतो की, आपण अर्थशास्त्र (Economics) अभ्यास मंडळावर निवडून आला आहात. त्याबद्दल आपले हार्दिक अभिनंदन.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ६२ नुसार अर्थशास्त्र (Economics) अभ्यास मंडळाचा कालावधी १ सप्टेंबर, २०१७ ते ३१ ऑगस्ट, २०२२ पर्यंत असेल. परंतु अभ्यास मंडळावरील आपल्या सदस्यत्वाची मुदत तात्काळ प्रभावाने सुरू होऊन दिनांक ३१ ऑगस्ट,२०२२ पर्यंत कलम ६३, ६४ आणि ६८ मधील तरतुदींच्या अधिन राहून असेल.

सदर अभ्यास मंडळ महत्वाचे असल्याने आपल्या सक्रीय सहभागाची व मार्गदर्शनाची अपेक्षा व्यक्त करतो.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ४० आणि ४१ नुसार अभ्यासमंडळाची रचना व कार्यसंबंधीची माहिती तसेच कलम ६३, ६४ आणि ६८ च्या छायांकित प्रती सोबत जोडत आहोत.

कृपया हे पत्र मिळाल्याची पोच द्यावी.

आपला विश्वासू,

(डॉ. दिनेश कांबळे)
कुलसचिव

E:\...\EL/Elec-2017/marath Faculty letter/Pc-4

# मुंबई विद्यापीठ

e-mail : arelection@election.mu.ac.in
Tel. No. : (022 )-22708798
(022 )-22696147

अत्यंत तातडिचे/हस्ते बटवडा
निवडणूक विभाग
क्र.नि.वि./आयमीडी/२०२०-२१/१५५.
१० मार्च, २०२१.

प्रति,
डॉ. राजाराम बाळासो पाटील
विभाग प्रमुख,
कला व वाणिज्य फोंडाघाट महाविद्यालय,
फोंडाघाट, गोंसारी रोड,
जिल्हा – सिंधुदुर्ग – ४१६ ६०१

महोदय,

आपणास कळविण्यास येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ४४(३)(घ) मधील तरतुदीनुसार मा.कुलगुरूंनी, आतंर–**विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे निमंत्रित** प्रतिनिधी म्हणून मुंबई विद्यापीठाच्या महाविद्यालयीन पदव्युत्तर शिक्षण मंडळावर आपले नामनिर्देशन केले आहे. मुंबई विद्यापीठाच्या महाविद्यालयीन पदव्युत्तर शिक्षण मंडळावर, झालेल्या नामनिर्देशनाबद्दल, विद्यापीठ प्रशासनातर्फे हार्दिक अभिनंदन.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ६२ नुसार महाविद्यालयीन पदव्युत्तर शिक्षण मंडळाचा कालावधी १ सप्टेंबर, २०१७ ते ३१ ऑगस्ट, २०२२ पर्यंत असेल. परंतु महाविद्यालयीन पदव्युत्तर शिक्षण मंडळावरील आपल्या सदस्यत्वाची मुदत तात्काळ प्रभावाने सुरू होऊन दिनांक ३१ ऑगस्ट, २०२२ पर्यंत कलम ६३,६४ आणि ६८ मधील तरतुदींच्या अधिन राहून असेल.

मी माझ्यातर्फे आणि विद्यापीठाच्यावतीने आपणाकडून महाविद्यालयीन पदव्युत्तर शिक्षण मंडळाच्या सर्व कामामध्ये आपल्या सक्रीय सहभागाची, उपदेशाची, सहकार्याची आणि मार्गदर्शनाची अपेक्षा व्यक्त करतो.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ४४(१) नुसार महाविद्यालयीन पदव्युत्तर शिक्षण मंडळाची रचना व कार्यसंबंधीची माहिती तसेच कलम ६२, ६३, ६४ आणि ६८ या छायांकित प्रती सोबत जोडत आहोत.

कृपया हे पत्र मिळाल्याची पोच पावती द्यावी.

आपला विश्वासू,

(डॉ. बळीराम गायकवाड)
प्र. कुलसचिव